रोहित भाईने शिव्या जरी दिल्या तरी मनाला लागत नव्हत्या! : शुभमनच्या वक्तव्याने भुवया उंचावल्या

लंडन । वृत्तसंस्था

भारतीय संघ इंग्लंड दौऱ्यावर असून कसोटी मालिका जिंकण्याचे मोठे आव्हान आहे. कारण मागच्या १७ वर्षात टीम इंडियाला ही मालिका जिंकता आलेली नाही. राहुल द्रविडच्या नेतृत्वात २००७ मध्ये भारताने मालिका जिंकली होती. त्यानंतर विजयाची चव काही चाखता आली नाही. दुसरीकडे, या दौऱ्यात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांची उणीव भासणार आहे. कारण या दोघांनी मागच्या महिन्यात कसोटीतून निवृत्ती जाहीर केली आहे. शुबमन गिलने एक मुलाखत दिली. त्यावेळी त्याने विराट कोहली आणि रोहित शर्माबाबत विधान केले.

शुबमन गिल रोहित शर्माबाबत म्हणाला की, असे वाटते की रोहित भाई खूप आक्रमक नाही पण तो सर्वात जास्त आक्रमक आहे. त्याच्या कर्णधारपदाखाली संवाद खूप स्पष्ट असायचा. मालिकेपूर्वी, मालिका सुरु असताना आणि मालिका संपल्यानंतर काही खेळाडूंशी थेट चर्चा करायचा आणि सांगायचा. शुबमन गिलने रोहित शर्माबाबत सांगितले की, रोहित शर्माने ज्या पद्धतीचे वातावरण बनवले होते. अशा स्थितीत त्याने शिव्या जरी दिल्या तरी मनाला लागत नव्हत्या. ते त्यांचे व्यक्तित्व आहे. ती त्यांची स्पेशालिटी आहे आणि दृढ झाली आहे. त्याने भलेही एखादी गोष्ट कठोरपणे सांगितली तरी त्याच्या मनात काही नसते. टीमच्या हिशेबाने तो सांगत असतो.

शुबमन गिलने विराट कोहलीबाबतही आपले मन मोकळं केले. जेव्हा मी विराट भाईच्या नेतृत्वाखाली खेळायचो, तेव्हा मला वाटते की त्याचे विचार आणि कसोटी सामन्यादरम्यानचे त्याचे विचार मला खूप आवडायचे. सामन्यादरम्यान, जर एखादी योजना यशस्वी झाली नाही, तर तो लगेच दुसरी योजना बनवतो आणि गोलंदाजाला काय करायचे आहे ते सांगतो. असं शुबमन गिलने पुढे सांगितले.

वूमन्स वर्ल्ड कप स्पर्धा ३० सप्टेंबरपासून

वेळापत्रक जाहीर : टीम इंडिया अन् पाकिस्तान भिडणार

मुंबई । वृत्तसंस्था

क्रिकेट विश्वातून या क्षणाची सर्वात मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. आगामी वूमन्स वर्ल्ड कप २०२५ स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. आयसीसीने २ जून रोजी या स्पर्धेचे आयोजन कोणत्या स्टेडियममध्ये होणार? या स्पर्धेत एकूण किती संघ सहभागी होणार? याबाबतची माहिती दिली होती. त्यानंतर आता बीसीसीआय सचिव देवजित सैकीया यांनी फेसबूकवरुन वूमन्स वर्ल्ड कप स्पर्धेचे वेळापत्रकाची माहिती दिली आहे. बीसीसीआय सचिवांनी फेसबूक पोस्टमध्ये दिलेल्या माहितीनुसार, वूमन्स वर्ल्ड कप स्पर्धेला ३० सप्टेंबरपासून सुरुवात होणार आहे. तर २ नोव्हेंबरला अंतिम सामना पार पडणार आहे. तर २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी उपांत्य फेरीतील सामने होणार आहेत.

या स्पर्धेच्या यजमानपदाचा मान हा भारताकडे आहे. तसेच श्रीलंकेची राजधानी कोलंबोतही काही सामने खेळवण्यात येणार आहेत. एकूण ५ स्टेडियममध्ये सामने होणार आहेत. बंगळुरु, इंदूर, वायझॅग, कोलंबो आणि गुवाहाटी इथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा राउंड रॉबिन पद्धतीने खेळवण्यात येणार आहे. साखळी फेरीत एकूण २८ सामने होणार आहेत. ३० सप्टेंबर ते २६ ऑक्टोबर दरम्यान एकूण ८ संघांमध्ये साखळी फेरीतील २८ सामने पार पडणार आहेत. प्रत्येक संघ साखळी फेरीत प्रत्येकी ७-७ सामने खेळणार आहे. त्यानंतर सेमी फायनलमधील २ सामने खेळवण्यात येतील. तर २ नोव्हेंबरला वर्ल्ड चॅम्पियन टीम निश्चित होईल.

टीम इंडिया या स्पर्धेतील साखळी फेरीतील पहिला आणि शेवटचा सामना खेळणार आहे. टीम इंडिया विरुद्ध पाकिस्तान यांच्यात महामुकाबला होणार आहे. पहलगाम हल्ल्यानंतर दोन्ही देशातील संबंध फार ताणले गेले होते. त्यामुळे भारत पाकिस्तान विरुद्ध खेळणार नाही, असे म्हटले जात होतं. मात्र बीसीसीआय सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. भारत यजमान असल्याने पाकिस्तानचे सर्व सामने हे कोलंबोतील आर प्रेमदासा स्टेडियममध्ये होणार आहेत.

दरम्यान इंग्लंड विरुद्ध न्यूझीलंड यांच्यात २६ ऑक्टोबर रोजी गुवाहाटीत होणाऱ्या सामन्याचा अपवाद वगळता उर्वरित सर्व सामन्यांना भारतीय वेळेनुसार एकाच वेळी सुरुवात होणार आहे. बीसीसीआय सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार, या सामन्यांना दुपारी ३ वाजता सुरुवात होणार आहे.

स्पर्धेतील भारतीय संघाचे वेळापत्रक

- मंगळवार, ३० सप्टेंबर, टीम इंडिया-श्रीलंका, बंगळुरू
- रविवार, ५ ऑक्टोबर, भारत-पाकिस्तान, कोलंबो
- गुरुवार, ९ ऑक्टोबर, भारत-दक्षिण आफ्रिका,वायझॅग
- रविवार, १२ ऑक्टोबर, भारत-ऑस्ट्रेलिया, वायझॅग
- रविवार, १९ ऑक्टोबर, भारत-इंग्लंड, इंदूर
- गुरुवार, २३ ऑक्टोबर, भारत-न्यूझीलंड, गुवाहाटी
- रविवार, २६ ऑक्टोबर, भारत-बांगलादेश, बंगळुरू
- बुधवार, २९ ऑक्टोबर, सेमी फायनल १, गुवाहाटी किंवा कोलंबो, दुपारी ३ वाजता
- गुरुवार, ३० ऑक्टोबर, सेमी फायनल २, बंगळुरू, दुपारी ३ वाजता
- रविवार, २ नोव्हेंबर, महाअंतिम सामना, कोलंबो किंवा बंगळुरू, दुपारी ३ वाजता

एविन लुईसच्या ४४ चेंडूंत ९१ धावा

मुंबई । वृत्तसंस्था

वेस्ट इंडिजच्या एका फलंदाजाने प्रतिस्पर्धी टीमच्या गोलंदाजांना इतकं धुतले की, ते दीर्घकाळ ही गोष्ट स्मरणात ठेवतील. वेस्ट इंडिजच्या या फलंदाजाच नाव आहे, एविन लुईस. १५ जूनला आयर्लंड विरुद्ध सीरीजच्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात लुईसची धुवधार बॅटिंग पहायला मिळाली. या टी-२० मॅचमध्ये एविन लुईस आयर्लंडच्या गोलंदाजांवर तुटून पडला. २०६ पेक्षा जास्त स्ट्राइक रेटने त्याने धावा केल्या. यात १५ वेळा चेंडू सीमारेषेपार पाठवला. लुईसने आयर्लंडच्या गोलंदाजांना कुठलीही दया-माया न दाखवता त्यांचा समाचार घेतला. लुईसने त्यांची जोरदार धुलाई केली. एविन लुईस आपल्या आणखी एका टी-२० शतकाच्या जवळ पोहोचला होता. त्याने आयर्लंडच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई केली. पण लुईसच टी२० शतक हुकले. एविन लुईसने ४४ चेंडूंचा सामना करताना २०६.८१ च्या स्ट्राइक रेटने ९१ धावा केल्या. ६३ मिनिटांच्या बॅटिंगमध्ये त्याने १५ वेळा चेंडू सीमारेषेपार पाठवला. यात ८ सिक्स आणि ७ बाऊंड्री आहेत.

इंग्लंड विरुद्धच्या पहिल्या कसोटीत शार्दुल ठाकुरची जागा पक्की!

मुंबई । वृत्तसंस्था

भारत आणि इंग्लंड कसोटी मालिकेची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. शुबमन गिलच्या नेतृत्वात टीम इंडिया कशी कामगिरी करणार याकडे लक्ष लागून आहे. या मालिकेपूर्वी टीम इंडियाची लिटमस टेस्ट होत आहे. भारत ए आणि भारत या संघात दोन हात होत आहेत. यामुळे प्लेइंग ११ निवडणे कर्णधार शुबमन गिल याला सोपे जाणार आहे. चार दिवसीय इंट्रा स्क्वॉड सामन्यात इंडिया ए साठी सरफराज खानने शतकी खेळी केली. त्यानंतर अष्टपैलू शार्दुल ठाकुरने फलंदाजीची चमक दाखवली. यामुळे पहिल्या कसोटीसाठी प्लेइंग ११ मध्ये त्याची निवड पक्की समजली जात आहे. इंडिया ए साठी शार्दुल ठाकुरने नाबाद १२२ धावांची खेळी केली. शार्दुल ठाकुरचा इंग्लंडमधील रेकॉर्ड चांगला आहे. त्याच्या या खेळीमुळे त्याचे प्लेइंग ११ मधील स्थान पक्कं समजले जात आहे. शार्दुल ठाकूरने २०२३ पासून भारतीय संघासाठी एकही कसोटी सामना खेळलेला नाही. दरम्यान, इंग्लंडच्या खेळपट्ट्यांवर अतिरिक्त फलंदाजीची खोली आवश्यक आहे. त्यामुळे शार्दुल ठाकूरची ही खेळी संघासाठी दिलासादायक बातमी आहे.

विंडीजचा धमाका, आयर्लंडचा ६२ धावांनी धुव्वा

मुंबई । वृत्तसंस्था

सामन्यासह मालिकाही जिंकली



वेस्ट इंडिज क्रिकेट टीमला इंग्लंड दौऱ्यात एकही सामना जिंकता आला नाही. विंडीजने वनडे आणि टी-२ मालिका गमावली. त्यानंतर विंडीज विरुद्ध आयर्लंड यांच्यात ३ सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना रविवारी १५ जून रोजी खेळवण्यात आला. उभयसंघातील पहिले २ सामने हे पावसामुळे रद्द करावे लागले. त्यामुळे तिसरा आणि अंतिम सामना जिंकून दोन्ही संघांना मालिका विजयाची संधी होती. त्यामुळे दोन्ही संघांमध्ये चुरस पाहायला मिळणार होती. मात्र विंडीजने टी-२० सामन्यात वन डे सारखा स्कोअर केला आणि पहिल्याच डावात विजय निश्चित केला आणि मालिका आपल्या नावावर करण्यात यश मिळवले.

विंडीजने २० ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून २५६ रन्स केल्या. प्रत्युत्तरात आयर्लंडनेही जोरदार प्रतिकार केला. मात्र त्यांचे प्रयत्न अपुरे ठरले. आयर्लंडला ७ विकेट्स गमावून १९४ धावांपर्यंतच पोहचता आले. विंडीजने अशाप्रकारे ६२ धावांनी हा सामना जिंकला. विंडीजने यासह ३ सामन्यांची मालिका १-० अशा फरकाने जिंकली. आयर्लंडने टॉस जिंकून विंडीजला बॅटिंगसाठी भाग पाडले. विंडीजने या संधीचा पूर्ण फायदा घेत आयर्लंडच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई केली.

आयर्लंडची बॅटिंग

आयर्लंडकडून अनेकांना अपेक्षित सुरुवात मिळाली. मात्र २५० पेक्षा अधिक धावांचं आव्हान पाहता विजयासाठी एकाकडून तरी मोठी खेळी हवी होती.आयर्लंडकडून तशी एकालाही मोठी खेळी करता आली नाही. मात्र आयर्लंडने सहजासहजी हार मानली नाही. आयर्लंड लढून हरली.

जाहिरात एजन्सी फेडरेशनची बिनविरोध निवड

पुणे। प्रतिनिधी

फेडरेशन ऑफ डव्हर्टायझिंग अँड मार्केटिंग एंटरप्रेनियर्सची जनरल बॉडी मिटिंग दि.१४ जून २०२५ रोजी पुणे येथे संपन्न झाली.

यावेळी पुणे, कोल्हापूर, नाशिसन २०२५-२७ या कालावधीसाठी अध्यक्षपदी रवी पवार (नाशिक), उपाध्यक्ष प्रकाशभाई शहा (पुणे), सचिव रामदेव व्यास (छत्रपती संभाजीनगर), सहसचिव अजिंक्य उजळंबकर (छत्रपती संभाजीनगर), खजानीस कौस्तुभ नाबर, (कोल्हापूर) तसेच पुढील २०२७-२९ या कालावधीसाठी अध्यक्ष (इलेक्ट) म्हणून संदीप झवेरी (सोलापूर) यांची यावेळी बिनविरोध निवड करण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य म्हणून संजय साताळकर (पुणे), सुनील बासरानी (कोल्हापूर), दीपक जगताप (नाशिक), संतोष उदगिरी (सावा), राहुल देशपांडे (सातारा), नरेंद्र चौधरी (जळगाव), अरुण मलिक (छत्रपती संभाजीनगर), राजेंद्र म्याना (अहिल्यानगर), सुनील बुधवानी (नागपूर), राजेश वाळवेकर (बेळगाव), परेश पेडणेकर (कोकण) यांची निवड करण्यात आली.

मॅकार्थी टी-२० मध्ये सर्वाधिक धावा देणारा गोलंदाज बनला

मुंबई । वृत्तसंस्था

४ षटकांत दिल्या ८१ धावा

गोलंदाज म्हटले तर त्याला एका क्षणात मॅच फिरवताही येते आणि मॅच घालवता देखील येते. आता अशाच एका सामन्यात एका गोलंदाजीची प्रचंड धुलाई झाली आहे. या बॉलरच्या ४ ओव्हरमध्ये ८१ धावा काढल्या गेल्या आहेत. त्यामुळे ही क्रिकेटच्या इतिहासातली सगळ्यात घाणेरडी गोलंदाजी ठरली आहे.

आयर्लंड आणि वेस्टइंडीजमध्ये सध्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामने सूरू आहे. या सामन्यात आयर्लंडचा वेगवान गोलंदाज लियाम मॅकार्थीच्या नावावर एक लाजिरवाणा विक्रम नोंदवला गेला आहे. मॅकार्थी टी-२० मध्ये चार षटकांत सर्वाधिक धावा देणारा गोलंदाज बनला आहे, तर तो एकूण टी-२० क्रिकेटमध्ये दुसरा सर्वात महागडा गोलंदाज बनला आहे.

मॅकार्थीच्या चेंडूंवर वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी खूप धावा केल्या. सलामीवीर एविन लुईसपासून रोमारियो शेफर्डपर्यंत सर्वांनी या गोलंदाजाच्या चेंडूंवर बरेच चौकार आणि षटकार मारले.

विधीलिखित

सुरेशराव बोरकर, ब्रह्मांड ज्योतिष कार्यालय, रावेर. मो. : ९८५००१५५५८

मंगळवार, दि.१७ जून २०२५

-*-* दैनंदिन राशिभविष्य *-*-

मेष – शत्रुची नजर आपणावर राहणार आहे.
वृषभ – वाहनात ऐनवेळी बिघाड होईल.
मिथुन – प्रवासात भाग्यकारक घटना घडतील.
कर्क – विद्यार्थी वर्गास अति उत्तम दिवस.
सिंह – तापदायक घटना घडू लागतील.
कन्या – विद्युत उपकरणापासून सावध राहावे.
तूळ – कायद्याचे प्रश्न उभे राहतील.
वृश्चिक – आपलीच माणसे विरोधात जातील.
धनू – प्रवास भाग्यकारक ठरतील.
मकर – मातृसाठी धावपळ करावी लागेल.
कुंभ – विश्वासू माणसे धोका देतील.
मीन – शेतीत अधिक कामे करावी लागतील.

करुण नायरला भारतीय क्रिकेटपटूने निवृत्त होण्याचा दिला होता सल्ला

मुंबई । वृत्तसंस्था

टीम इंडियाला आता २० जूनपासून इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिका खेळायची आहे. जेव्हा ५ सामन्यांच्या या कसोटी मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा करण्यात आली तेव्हा करुण नायरचे नाव पाहून सर्व क्रिकेट चाहते आनंदी झाले होते. कारण बऱ्याच काळापासून, भारतीय स्थानिक क्रिकेटमध्ये स्फोटक फलंदाजी करत करुण नायरने निवडकर्त्यांना सांगितले होते की तो आता टीम इंडियामध्ये पुनरागमन करण्यास पूर्णपणे तयार आहे. करुण नायर बऱ्याच काळानंतर टीम इंडियामध्ये परतला आहे. तथापि, त्याने खुलासा केला की जेव्हा त्याला राष्ट्रीय संघातून संधी मिळत नव्हती तेव्हा एका भारतीय क्रिकेटपटूने त्याला निवृत्ती घेण्यास सांगितले होते. नायरला हा सल्ला २ वर्षांपूर्वी प्रसिद्ध भारतीय खेळाडूने दिला होता.

एका मुलाखतीत नायर म्हणाले, ममला अजूनही आठवते की एका आघाडीच्या भारतीय क्रिकेटपटूने मला फोन करून सांगितले होते की तू निवृत्ती घ्यावी कारण या लीगमध्ये तुला मिळणारे पैसे मला सुरक्षित ठेवतील. ते करणे सोपे झाले असते, पण मला माहित होते की पैसे असूनही, मी इतक्या सहजपणे निवृत्ती घेतल्याबद्दल स्वतः ला पश्चाताप झाला असता.

मला पुन्हा भारतासाठी खेळणे सोडायचे नव्हते. हे फक्त दोन वर्षांपूर्वीचे आहे आणि आता आपण कुठे आहोत ते पहा. हे वेडेपणाचे आहे, पण आतून मला माहित होते की मी पुरेसा चांगला आहे.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि.यांच्याकरिता **सकाळ मीडिया प्रा.लि.**, प्लॉट नं.सी-३, एम.आय.डी.सी.एरिया टेलिफोन एक्सचेंजसमोर, औरंगाबाद रोड, जळगाव-४२५००३ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, ई-७/९, व.वा.मार्केट (गोलाणी मार्केट) दुसरा मजला, नवी पेठ जळगाव येथे प्रसिध्द केले. ● **संपादक : हेमंत दिनेश अलोने*. फोन नं.**: जळगाव शहर कार्यालय-२२२८७८१, २२२४६६०, भुसावळ-२२०६८०, २२४७९५, रावेर-२५०४४४, धुळे-२३७९१४, फॅक्स-२३८९१४, नंदुरबार २२११०१. **RNI.No. 68337/1997** पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. **JAL./123/2018-2020** (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)